




दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २९१ वा मंगळवार दि 0३ फेब्रुवारी २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# समान नाही, तर किमान द्या! मुंबई महापौरपदाबाबत शिवसेनेची भाजपकडे मागणी, सत्तावाटपाचा फॉर्म्युला काय?

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकीत एकत्र लढलेल्या शिवसेना-भाजपला बहुमत मिळाल्यानंतर दोन्ही पक्ष एकत्र येऊन महायुतीचा गट स्थापन करण्याच्या तयारीत आहेत. या गटाचे नेते म्हणून भाजपचे गणेश खणकर आणि प्रभाकर शिंदे यांची नावे चर्चेत आहेत. शिवसेनेने समसमान अडीच वर्ष नाही, तर किमान सव्वा वर्षांसाठी मुंबईचे महापौरपद द्यावे अशी मागणी केली आहे. सत्तावाटपाचा प्रस्ताव भाजपने मान्य केल्यास शिवसेना ही महायुतीचा संयुक्त गट स्थापन करण्यास तयार होईल, असे सेना पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावर अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच घेतील. भाजप आणि शिवसेना एकत्र येऊन एक मोठा गट तयार करणार आहेत. या गटाचे नेतृत्व कोण करणार यावर चर्चा सुरू आहे. भाजपचे गणेश खणकर आणि प्रभाकर शिंदे हे दोघेही या पदासाठी प्रबळ दावेदार मानले जातात. गणेश खणकर हे बोरिवलीचे भाजप नगरसेवक आहेत. ते भाजपचे जुने नेते आहेत. प्रभाकर शिंदे हे मुलुंडमधून भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक आहेत. विशेष म्हणजे, प्रभाकर शिंदे हे आधी शिवसेनेत होते आणि २०१७ मध्ये भाजपमध्ये सामील झाले. मुंबई महापालिकेचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला तेव्हा तेच भाजपचे गट नेते होते. ते स्थायी समितीचे सदस्यही होते. जर गणेश खणकर यांना भाजपचे गटनेते झाले, तर प्रभाकर शिंदे हे स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदार ठरतील. गटनेत्याचे पद ५ वर्षांसाठी असते. पण स्थायी समितीच्या अध्यक्षांची निवड दरवर्षी होते आणि त्यांचा कार्यकाळ फक्त १ वर्षाचा असतो. एका वरिष्ठ भाजप नेत्याने सांगितले की, ङ्कङ्कपक्षाला गट नेते म्हणून मूळ भाजपचा कार्यकर्ता हवा आहे. तसेच तो मराठी असावा. गणेश खणकर या दोन्ही निकषांमध्ये बसतात. प्रभाकर शिंदे हे मूळचे शिवसेनेचे असले तरी ते खूप अनुभवी आहेत. त्यामुळे ते स्थायी समितीसारखे महत्त्वाचे पद सांभाळण्यासाठी अधिक योग्य ठरतील.या दोन्ही पक्षांमध्ये सत्ता वाटपाचा एक फॉर्म्युला ठरला आहे. त्यानुसार भाजपचा नगरसेवक गट नेता असेल. पण ११८ नगरसेवकांच्या या संयुक्त गटाचा व्हिप (मुख्य प्रतोद) शिवसेनेचा असेल. याचा अर्थ, शिवसेनेला गट नेते पद मिळाले नाही तरी, व्हिपच्या माध्यमातून त्यांना संयुक्त गटावर नियंत्रण ठेवता येईल. या सत्ता वाटपानुसार, भाजपला महापौर पद आणि स्थायी



समितीचे अध्यक्षपद मिळण्याची शक्यता आहे. तर शिवसेनेला सुधारणा समिती, आरोग्य समिती आणि बेस्ट समितीचे अध्यक्षपद तसेच उपमहापौर पद मिळू शकते. शिवसेनेचे नगरसेवक अमेय घोले हे शिवसेनेचे व्हिप म्हणून काम पाहू शकतात. मुंबई महापालिकेमध्ये संयुक्त गट स्थापन करण्याबाबतचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात होईल. मात्र सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संयुक्त गट स्थापन करण्याचा मार्ग जवळपास मोकळा झाला आहे.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाला थेट मोदींचा हिरवा कंदील?

## खळबळजनक दावे, सुप्रिया सुळेंना केंद्रीय मंत्रिपदाची चर्चा...

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली निधन झाल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण करण्याच्या हालचालींना वेग आल्याचा दावा मुख्यत्वे राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांकडून केला जात आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सावध भूमिकेत असून सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी या चर्चा उडवून लावल्या आहेत. अशातच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाला खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा कंदील दाखवल्याचा दावा केला जात आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून दोन्ही गटांचे विलीनीकरण ही अजित पवारांची इच्छा असल्याचे ठामपणे सांगितले जात आहे. तर सुनेत्रा पवारांकडे नेतृत्व असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी सावध पवित्रा घेतला आहे. अशातच याबाबत नवी माहिती एबीपी न्यूजने दिली आहे. शरद पवारांना सोडल्याचा डाग अजितदादांना पुसायचा होता, तसंच बहीण सुप्रिया सुळेंसोबतचं नातंही पुन्हा नव्याने जोडायचं होतं, त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादींच्या एकत्रिकरणाच्या हालचाली वेगवान झाल्याचं बोललं जातं. नागपूर अधिवेशनावेळी अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या बैठका झाल्या. अजित पवार यांनी याविषयी देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घातल्याचा दावा केला जात आहे. फडणवीसांनी याबद्दल केंद्रात बोलावं लागेल, असं सांगितलं. त्यानंतर अजितदादा आणि अमित शाह यांच्यात अहिल्यानगरमध्ये याविषयी बोलणी झाल्याची माहिती आहे. पुढे शाहांची मोदींसोबत चर्चा झाली आणि केंद्रातून ग्रीन सिग्नल आला. १६ जानेवारीला अजित पवार यांच्यासोबत सुप्रिया सुळे , रोहित पवार, जयंत पाटील, अमोल कोल्हे यांच्यात बैठक झाली. याबद्दल शरद पवारांना सांगण्यात आलं. तर जिल्हा परिषद निवडणुका दोन्ही गटांनी घड्याळ चिन्हावर लढवण्याचा निर्णय झाला अजित पवार यांनी सुरु केलेल्या विलीनीकरणाच्या प्रयत्नांना त्यांच्याच



पक्षातील नेत्यांची साथ नव्हती, असंही म्हटलं जात आहे. कारण शरद पवार यांची राष्ट्रवादी संसदेत दादांपेक्षा ताकदवान आहे. तो गट अजित दादांच्या पक्षात विलीन झाला असता सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद, एका नेत्याला (जयंत पाटील किंवा रोहित पवार) राज्यात कॅबिनेट मंत्रिपद किंवा राज्यमंत्रिपद असा प्रस्ताव होता. त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांना मोदी सरकारमध्ये मंत्रिपद मिळवण्याचा मार्ग अवघड झाला असता.



# जयगीत जागृताचे...

हाती आलेल्या एका मताधिकारातून देशाची सरकारे बदलणारी, आपल्यासोबत किंवा पुढे-मागे स्वतंत्र झालेल्या देशांबरोबर आपली तुलना गैरलागू ठरणार नाही. शेजारच्या पाकिस्ताननेही लोकशाही स्वीकारली खरी; पण तेथील बहुसंख्य पंतप्रधान आपला कार्यकाळ पुरा करू शकले नाहीत. काहींना फाशी किंवा बॉम्बस्फोटांत प्राण गमवावे लागले. दुसरा शेजारी चीनचा आर्थिक विकास आणि एका रात्रीत उभ्या राहणाऱ्या किंवा भुईसपाट होणाऱ्या विकासकामांमुळे अनेकांचे डोळे दिपून जातात आणि वेगवान प्रगतीसाठी अशीच राजवट हवी,फ म्हणणाऱ्यांची संख्याही कमी नाही. मात्र, रणगाड्यांच्या चाकाखाली तेथे दडपला जाणारा विद्यार्थ्यांचा-सर्वसामान्यांचा आक्रोश नजरेआड केला जातो; तसेच घटत्या देशांतर्गत क्रयशक्तीमधून तेथील कामगारांचे शोषण, नागरिकांचे यंत्रवत जीवन आणि अपुऱ्या मोबदल्याचे वास्तव आपण सोसू शकू का, याचे उत्तर ही मंडळी देऊ शकत नाहीत. त्या तुलनेत लोकशाहीच्या मार्गाने आपली आर्थिक-राजकीय आणि सामाजिक वाटचाल धीमी वाटली, तरी तिला शाश्वताची अंगभूत जोड आहे. त्यासोबतच गेल्या काही महिन्यांत इतर शेजारी देशांमधील सत्ता उलथून टाकणारे आणि सत्ताधाऱ्यांना परागंदा करून सोडणारे उद्रेक पाहिले, तर एका रात्रीत होणाऱ्या अशा कथित क्रांतीच्या तुलनेत आपल्या लोकशाहीत होणारी उत्क्रांती कितीतरी श्रेष्ठच. आपल्याकडेही आणीबाणीसारखे लोकशाहीला नख लावणारे कालखंड जरूर आले; पण जनमताने लोकशाहीच्याच मार्गाने त्यावर मात केली, हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्य-न्याय आणि बंधुतेची मूल्ये शिरोधार्ह मानणारी आणि कितीही भ्रष्ट झाली, तरी कोणत्याही रूपातील निरंकुशतेपेक्षा श्रेष्ठ असलेल्या भारतीय लोकशाहीच्या प्रतिष्ठापनेस आज ७६ वर्षे पूर्ण होत आहेत. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात हा वृद्धापकाळ म्हणून गणला जाईल; पण राष्ट्रांच्या वाटचालीत काळ पाखरांसारखा उडून जातो. तरीही, परिपक्वता आणि नित्यनूतनाचा ध्यास घेताना देशाच्या या अंतरात्म्याचा आवाज सतत ऐकणे क्रमप्राप्त ठरते. या वाटचालीत काय मिळवले आणि काय गमावले, यावर नजर टाकली, तर अनेक कडूगोड आठवणी येतात. जात-धर्म-लिंग किंवा शिक्षण-आर्थिक परिस्थितीच्या पलीकडे जाऊन प्रत्येक सज्ञान भारतीयाला मिळालेला मताधिकार तोवर अनेक प्रगत देशही देऊ शकले नव्हते. काही वर्षांनी हे वय २१वरून १८वर आले, हे पुढे पडलेले आणखी एक पाऊल. सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारे एकवीसावे कलम असो, की अभिव्यक्तिस्वातंत्र्य देणारे एकोणिसावे कलम; अशा घटनेने दिलेल्या अनेक देणग्यांचा भारतीयांचे जीवन अधिकाधिक समृद्ध करण्यात सिंहाचा वाटा आहे. त्यानंतरही ७२व्या व ७३व्या घटनादुरुस्तीने आपल्या गाव-शहरात आपलेच सरकार हा महत्त्वाचा अधिकार दिला. अगदी नव्या शतकातही शिक्षणहक्क कायदा, अन्नसुरक्षा कायदा, माहितीचा अधिकार लोकशाहीनेच दिला आहे. त्यासोबतच महिलांना आरक्षण दिल्याने आणि तिहेरी तलाकमधून सुटका केल्याने तर भारताने महिला सबलीकरण व मानवी हक्कांच्या दिशेने मोठा पल्ला गाठला, हे सारे जग मान्य करील. अर्थात, दर पाच वर्षांनी नियमित होणाऱ्या निवडणुका आणि अधूनमधून होणारे सत्तांतर एवढाच लोकशाहीचा मर्यादित अर्थ घेऊन आपली पाठ थोपटून घेणे, ही फसगत ठरेल. स्वातंत्र्य, न्यायपूर्ण वागणूक, समता आणि विविधतेचा आदर या आघाड्यांवर आपल्याला मोठा पल्ला गाठावा लागणार आहे. या कसोट्यांवर आज संमिश्र चित्र दिसून येते. एकीकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असताना दुसरीकडे या अभिव्यक्तीचे अतिरेकी वळणही लपून राहत नाही. केंद्रीकरणाचे एकेक टप्पे गाठणाऱ्या करररचनेतील वितरण व्यवस्था हा आज वादांचा विषय बनतो आहे. केंद्र आणि राज्यांच्या संघर्षामध्ये संघराज्यव्यवस्थेला आव्हाने उभी राहिली आहेत. घटनेच्या वेगवेगळ्या स्तंभांमधील संघर्षही निकोप राहिलेले नाहीत. घाऊक प्रमाणातील पक्षांतरांनी देशात जनादेशाचा दररोज अवमान होत आहे आणि तो निमूट पाहण्याविना नागरिकांपुढे पर्याय राहिलेला नाही. एकसुरीपणाच्या पांघरूणाखाली विविधता दडपण्यात आपणही धन्यता मानू लागलो आहोत आणि मतभेदांचा आदर करण्याच्या भावनेला तर संसदेपासून ते समाजमाध्यमांपर्यंत सर्वत्र सोडचिठ्ठी देण्यात येत आहे. देशात अघोषित आणीबाणी आहे का, याचे सध्याचे उत्तर नाही असे असले, तरी ती भविष्यात येऊ नये, यासाठी सतत जागरूक राहण्याबाबत तरी दुमत नसावे. त्यामुळेच डोळे झाकून एकमेवद्वितियचा घोष करण्यापेक्षा लोकशाही अधिक चांगल्या पर्यायाचा मार्ग खुला ठेवते, हे लक्षात घेणे क्रमप्राप्त आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राष्ट्रवादीचं विलीनीकरण करायचं असेल तर...; फडणवीसांची रोखठोक भूमिका

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा सुरू असून विविध नेत्यांकडून दावे-प्रतिदावे केले जात आहेत. राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती आणि १२ फेब्रुवारी रोजी याबाबतची अंतिम घोषणा करण्यात येणार होती, असं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नुकतंच सांगितलं. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पवारांचा हा दावा खोडत राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.आताच्या स्थितीत आम्हाला राजकारण करायचं नाही. अन्यथा मी अनेक गोष्टी सांगू शकतो. काय घडलं आहे, काय घडतंय, मला सगळं माहीत



आहे. मी सगळ्या गोष्टींचा साक्षीदार आहे. तुम्हालाही सगळ्यांना माहीत आहे की, अजितदादा आणि माझे जे संबंध होते त्यामुळे ते सगळ्या गोष्टी माझ्याशी शेअर करायचे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्याच्या आदल्या दिवशी जवळपास एक तास आम्ही गप्पा मारत बसलो होतो. त्यामुळे मला असं वाटतं की खालच्या स्तराचं राजकारण करणं योग्य नाही. अजित पवार हे जर अशा प्रकारची कोणत्याही विलीनीकरणाची चर्चा करत असते, तर अशा प्रकारची कोणतीही चर्चा ते भाजपशी चर्चा केल्याशिवाय करतील का?' असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे.राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर भूमिका मांडताना देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, 'विलीनीकरण करायचं की नाही, हे सर्वस्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निर्णय आहे. आमची अपेक्षा फक्त एवढी आहे की, हा निर्णय घेत असताना त्यांनी आमच्याशी चर्चा करायला हवी. कुठलाही निर्णय घेण्याआधी त्यांनी आम च्याशी एकदा चर्चा करावी. राष्ट्रवादी पक्ष आमच्याशी अशी चर्चा करतोच आणि यापुढे करेल,' असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.दरम्यान, 'दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, अजित पवार जर शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत विलीनीकरणाबाबत चर्चा करत होते तर ते काय एनडीएतून बाहेर पडण्यासाठी अशा प्रकारची चर्चा करत होते का? ते तर स्पष्टपणे सरकारमध्ये स्टेबल होते. त्यामुळे रोज काहीतरी संभ्रम तयार करायचा आणि आपली एकोसिस्टम वापरून तो संभ्रम एको तयार करायचा, ही पद्धत अयोग्य आहे,' असंही फडणवीस म्हणालेमागील सहा महिन्यांपासून अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात चर्चा सुरू होती. अजितदादा, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, सुनील तटकरे यांच्यात सर्वांना एकत्र आणण्यासाठी संवाद सुरू होता.

## अजितदादांनी मला सांगितले नसते का ? फडणवीस यांचा प्रश्न

**मुंबई :** 'अजित पवार हे आमच्या सरकारमध्ये होते, शिवाय माझ्याशी त्यांचे व्यक्तिगत संबंधही खूप चांगले होते. अजित पवार जर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा करत असतील आणि या विलीनीकरणाची तारीखही ठरली असेल तर ते मला सांगणार नाहीत का, किंबहुना विलीनीकरणाची चर्चा भाजपसोबत करणार नाहीत का?', असा प्रश्न करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी अप्रत्यक्षपणे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेतील हवा काढून टाकण्याचा प्रयत्न केला.गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. त्यावर मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. 'अजित पवार आणि शरद पवार या दोघांमध्ये काय चर्चा झाली हे मला माहित नाही. विलीनीकरणाबाबत कोणती तारीख ठरली होती त्याची कल्पना मला नाही. अशा वेळी राजकारण करणे मला योग्य वाटत नाही. अन्यथा मीदेखील अनेक गोष्टी सांगू शकतो पण ते मी करणार



नाही', अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली.दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस हे स्वतंत्र पक्ष आहेत. त्यांचे निर्णय सर्वस्वी तेच घेत असतात. त्यात आमचा कोणताही हस्तक्षेप नसतो. पण अजित पवारांचा पक्ष सरकारमध्ये आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबतचा निर्णय ते घेणार असते तर त्यांनी आमच्याशी निश्चितच चर्चा केली असती. ते चर्चा करत होते म्हणजे सरकारमधून ते बाहेर पडणार होते का? पण सरकार तर स्थिर आहे. आपली इकोसिस्टीम वापरून काहीजण संभ्रम निर्माण करायचा प्रयत्न करत आहेत. अजितदादांचे आणि माझे वैयक्तिक संबंध खूप वेगळे होते. ते प्रत्येक गोष्ट माझ्याशी शेअर करायचे.

## धोका ओळखून शिंदेसेना 'स्वतंत्र' राहणार

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीत बाजी मारणाऱ्या महायुतीनं अद्याप गटनोंदणी केलेली नाही. भाजप , शिवसेनेनं मुंबईत ११८ जागा जिंकल्या. भाजपनं ८९, तर शिंदेसेनेनं २९ जागांवर बाजी मारली. पण दोन्ही पक्षांच्या नगरसेवकांची नोंदणी झालेली नाही. दोन्ही पक्षांच्या नगरसेवकांचा एकच गट असावा, असा भाजपचा आग्रह आहे. तर पक्षाचं स्वतंत्र अस्तित्व राखण्यासाठी शिवसेना आपला वेगळा गट तयार करण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. अखेर हा पेच सुटलेला आहे. नवी मुंबईत असलेल्या कोकण भवनात उद्या गटनोंदणीची प्रक्रिया पार पडेल.भाजप आणि शिवसेनेची गट नोंदणी उद्या होईल. दोन्ही पक्षांचे दोन स्वतंत्र गट असतील. त्यांची नोंदणी वेगवेगळी होईल. त्यामुळे शिंदेसेनेला त्यांचं स्वतंत्र अस्तित्व राखता येईल. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी शिवसेनेला पाठिंबा दिलेला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांची एक गट म्हणून नोंदणी होईल. या गटात शिवसेनेचे २९ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ३ नगरसेवक असतील.

## राष्ट्रवादीचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण ? दादांच्या नेत्यानं सस्पेन्स संपवला

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्याआधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी त्यांची निवड करण्यात आली. सगळ्या आमदारांनी एकमतानं त्यांनी निवड केली. यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचं राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार यावर चर्चा सुरु झाली आहे. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी भाष्य केलं आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिकरणावरही ते सविस्तर बोलले. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचं विलीनीकरण हा कौटुंबिक विषय आहे. यासंदर्भात सुनेत्रा पवार निर्णय घेतील आणि तो आम्हाला मान्य असेल, असं कोकाटे म्हणाले. 'विलीनीकरणासाठी काय अटी, शर्थी आहेत, काय चर्चा झाली, याबद्दल आम्हाला माहिती नाही. जोपर्यंत आमची चर्चा होत नाही, तोपर्यंत विलीनीकरणावर बोलणं योग्य होणार नाही. यासंदर्भात दादांनी वहिनींसोबत विलीनीकरणासंदर्भात चर्चा केलेली असेल. आम्ही अद्याप



वहिनींसोबत चर्चा केलेली नाही. हा निर्णय कौटुंबिक पातळीवर चर्चेअंती होईल. तो निर्णय विधिमंडळाच्या सगळ्या आमदारांना आणि पदाधिकाऱ्यांना मान्य असेल,' असं कोकाटे म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल यांची निवड झाल्याचं विधान केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते पीयूष गोयल यांनी केलं. त्यानंतर त्यांनी यावरुन सारवासारव केली. राष्ट्रवादीसारख्या पक्षाचा अध्यक्ष पाटील व्हावा, पटेल नसावा, अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही त्यांचं मत मांडलं. यावरही माणिकराव कोकाटे यांनी भाष्य केलं.आमच्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा फक्त आणि फक्त सुनेत्रा पवारच होणार.

# बॅकफफूटवर गेलेल्या पार्थ पवारांना सर्वात मोठी संधी ?

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्या सध्या राज्यसभेच्या खासदार आहेत. विधिमंडळाच्या सदस्य होईपर्यंत तरी त्या खासदारकीचा राजीनामा देणार नाहीत. खासदारकीचा राजीनामा दिल्यावर त्या बारामतीमधून विधानसभेची पोटनिवडणूक लढवतील, अशी दाट शक्यता आहे. सुनेत्रा पवार यांच्या खासदारकीच्या राजीनाम्यानंतर त्यांचे पुत्र पार्थ यांचं नाव राज्यसभेसाठी आघाडीवर आहे

पार्थ पवार यांनी २०१९ मध्ये मावळमधून लोकसभेची निवडणूक लढवली. पण शिवसेनेच्या श्रीरंग बारणे यांनी त्यांचा धुव्वा उडवला. त्यानंतर पार्थ निवडणूक लढलेले नाहीत. पार्थ यांना लोकसभेची उमेदवारी देण्यास शरद पवार यांचा विरोध असल्याची चर्चा तेव्हा झाली ऑगस्ट २०२० मध्ये हा शरद पवार यांनी ही प्रतिक्रिया दिली होती.होती. एकाच



कुटुंबातून किती जणांना निवडणूक लढवायची, असा प्रश्न करत शरद पवार यांनी तेव्हा माढ्यातून स्वतः माघार घेतली होती.२०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं. त्यावेळी अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या आत्महत्येचं प्रकरण गाजलं. या प्रकरणी सीबीआय चौकशी व्हावी, अशी मागणी पार्थ पवार यांनी केली. त्यावर माझ्या नातवाच्या म ताला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही, असं शरद पवार प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना प्रतिक्रिया देताना म्हणाले आहेत.यानंतर आता साडे पाच वर्षांनी शरद पवार यांची राज्यसभेची टर्म संपत आहे. शरद पवार यानंतर सक्रिय राजकारणातून निवृत्त होतील. ते निवृत्त झाले नसते, तरीही त्यांच्या पक्षाकडे त्यांना पुन्हा राज्यसभेवर पाठवण्याइतकं संख्याबळ नाही. राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचं विधानसभेतील संख्याबळ केवळ १० इतकं आहे. तर दुसरीकडे शरद पवार यांचे नातू पार्थ पवार अगदी सहज राज्यसभेवर जाऊ शकतात.येत्या २ एप्रिलला राज्यातील ७ खासदारांची राज्यसभेची टर्म संपेल. यात राष्ट्रवादी काँग्रेस शपचे शरद पवार, फौजिया खान, शिवसेना उबाठाच्या प्रियंका चतुर्वेदी, काँग्रेसच्या रजनी पाटील, भाजपचे भागवत कराड, आरपीआयचे रामदास आठवले, राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांचा समावेश आहे. विधानसभेत महायुतीचं संख्याबळ २३० च्या पुढे आहे. या सात जागांसह सुनेत्रा पवार यांच्या रिक्त जागेसाठी मतदान झाल्यास एका उमेदवाराला पहिल्या पसंतीची ३३ मतं निवडून येण्यासाठी लागतील.म हायुतीकडे सध्या असलेलं संख्याबळ पाहता भाजपचे ४ आणि शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक-एक उमेदवार विजयी होऊ शकतो. याचा अर्थ पार्थ पवार अगदी सहज राज्यसभेवर जाऊ शकतो. त्यांचं खासदारकीचं स्वप्न पूर्ण होऊ शकतं. त्याचवेळी त्यांचे आजोबा राज्यसभेतून निवृत्त होतील. राष्ट्रवादी शपकडे एकही उमेदवार निवडून आणण्याइतकं संख्याबळ नाही. राष्ट्रवादी शप, शिवसेना उबाठा आणि काँग्रेस यांची गोळाबेरीज केली तर त्यांचा एक उमेदवार विजयी होऊ शकतो. शरद पवार यांनी त्यांच्या आयुष्यात अनेकांना खासदार, आमदार केलं. पण आता त्यांच्या पक्षाची अवस्था बिकट आहे. तर दुसरीकडे शरद पवार यांनी साडे पाच वर्षांपूर्वी ज्या पार्थ पवार यांना इमर्च्युअर म्हटलं, तेच पार्थ पवार आता राज्यसभेवर जाण्याची दाट शक्यता आहे.

# नगरमध्ये 'हनीट्रॅप'चा थरार; गळ्याला कोयता लावून लुटले, पैशांवर गोव्यात मौजमजा केली पण घरी परतताच..

**अहिल्यानगर :** प्रेमाच्या बहाण्याने जाळ्यात ओढून निर्घृण लूट करणाऱ्या हनिट्रॅप टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठा पर्दाफाश केला आहे. दोन तरुणींसह पाच जणांना अटक करण्यात आली असून चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या सराफालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत तब्बल २ लाख ८८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोड बोलणं, थेट बारदरीत सापळा प्रेमाचा बहाणा करत तरुणीने फोनवरून फिर्यादीला गाठले. तिच्या बोलण्याला भुलून फिर्यादी थेट बारदरी (गर्भगिरी फाटा) येथे भेटीसाठी पोहोचला. मात्र तिथे आधीच दबा धरून बसलेल्या आरोपींनी गळ्याला कोयता लावून सोने-चांदीचे दागिने व रोकड लुटली. बदनामीच्या भीतीने फिर्यादीने सुरुवातीला रस्ता लुटीची तक्रार दिली. मात्र, याच तक्रारीचा तपास करत असताना एलसीबीच्या पोलिसांना हा संपूर्ण हनिट्रॅपचा कट उघडकीस आला. गंभीर स्वरूपाचा गुन्हा लक्षात घेता, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक किरणकुमार कवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तपोवन रोड येथे सापळा रचून मुख्य आरोपी शुभम बडे याला अटक केली. चौकशीत त्याने दोन तरुणी व अन्य साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिलीअटक केलेले आरोपी शुभम शहादेव बडे (वाणीनगर, सावेडी),सोहेल पापाभाई सय्यद (देवटाकळी, शेवगाव),अशपाक नासिर पठाण (यशवंतनगर, भिंगार),वैष्णवी राजेंद्र उनवने (भगवान बाबा चौक, अहिल्यानगर),रुपाली गजानन बनकर



(एमआयडीसी, अहिल्यानगर) चोरीचे दागिने खरेदी करणारा सराफ सुरज प्रदीप शहाणे (शास्त्रीनगर, केडगाव) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चोरीचे दागिने सराफाकडे विक्री चौकशीत आरोपींनी लुटलेले दागिने सराफाला विकल्याचे उघड झाले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या सराफाने पोलिसी खाक्या दाखवताच मुद्देमाल काढून दिला.हनिट्रॅपद्वारे लूट केल्यानंतर आरोपी थेट गोवा ट्रिपला गेले. सम द्रकिनाऱ्यावर मौजमजा करून नगरमध्ये परतताच एलसीबीच्या पथकाने झडप घालून सर्वांच्या मुसक्या आवळल्या. सराईत गुन्हेगारांचा सहभाग मुख्य आरोपी शुभम बडे याच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल आहेत. तर अशपाक पठाण याच्यावर भिंगार पोलिस ठाण्यात दोन गुन्हे नोंद आहेत. अनेकांना गंडवल्याचा संशय आरोपींनी यापूर्वीही पाच ते सहा जणांना अशाच पद्धतीने गंडवल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. इज्जतीच्या भीतीने अनेकांनी तक्रार दिली नसावी, असा संशय आहे. पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा किरणकुमार कबाडी यांनी सांगितले की हनिट्रॅपसारखा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. अन्य काही पीडित पुढे येण्याची शक्यता आहे , फसवणूक झालेल्यांनी निर्भयपणे पोलिसांशी संपर्क साधावा.

## बडतर्फ पोलिसाचा लॉजवर गूढ मृत्यू, 'ओव्हरडोस'चा संशय

**नाशिक :** सराईत गुन्हेगारांसह अमली पदार्थ बाळगणाऱ्यांच्या संपर्कात असल्याने सात महिन्यांपूर्वी नाशिक शहर पोलिस दलातून बडतर्फ केलेल्या तत्कालीन पोलिस कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. इरफान मन्सूर शेख (वय ३५, रा. वडाळागाव) असे मृताचे नाव आहे.इरफानने आत्महत्या केली, की नशेच्या 'ओव्हर डोस' मुळे त्याचा हृदयविकाराने मृत्यू झाला यासंदर्भातील तपास सुरू आहे. शवविच्छेदनानंतर 'व्हिसेरा' राखून ठेवण्यात आला आहे. भद्रकाली पोलिसांच्या हद्दीत असलेल्या एका लॉजमधील खोलीत शनिवारी (दि. ३१) रात्री उशिरा इरफानचा मृतदेह आढळला.रविवारी (दि. १) सकाळी जिल्हा शासकीय रुग्णालयात विच्छेदन करण्यात आले. त्यावेळी इरफानच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होत नसल्याने 'व्हिसेरा' राखून ठेवण्यात आला. शनिवारी सायंकाळी उशिरा तो परराज्यातून नाशिकमध्ये परतला होता. भद्रकाली हद्दीत एका



लॉजमध्ये मुक्कामासाठी गेल्यावर हा प्रकार घडला.अतिनशेत त्याला हृदयविकाराचा झटका आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. भद्रकाली पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद असून, तपास सुरू आहे. इरफान याच्या पश्चात वडील, पत्नी व दोन मुलगे असा परिवार आहे. त्याचे वडील नाशिक पोलिस दलातून निवृत्त झालेले असून, त्याचे सख्खे व चुलतभाऊ शहर पोलिस दलात कार्यरत आहेत.दुसरीकडे, आपण पोलिस अधिकारी असल्याचे भासवून खोट्या गुन्ह्याची धमकी देऊन पाच लाखांची खंडणी मागणाऱ्या तोतयाविरुद्ध अहिल्यानगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तीन वर्षांच्या मुलासह विवाहितहची आत्महत्या

**बीड :** तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही आता चैनीची वस्तू नसून गरज बनली आहे, मात्र याच मोबाईलच्या हट्टापायी एका सुखी संसाराची राखरांगोळी झाल्याची हृदयद्रावक घटना बीड तालुक्यात घडली आहे. पतीने मोबाईल घेऊन दिला नाही या कारणावरून संतापलेल्या एका २४ वर्षीय महिलेने आपल्या अवघ्या तीन वर्षांच्या मुलासह विहिरीत उडी घेऊन जीवनयात्रा संपवली. ही खळबळजनक घटना बीड तालुक्यातील लिंबारूई शिवारात घडली आहे.प्राजक्ता उर्फ राधा रामेश्वर दराडे (वय २४ वर्षे) ही महिला आपल्या कुटुंबासह लिंबारूई परिसरात वास्तव्यास होती. गेल्या काही दिवसांपासून ती आपला पती रामेश्वर दराडे यांच्याकडे नवीन मोबाईल घेऊन देण्यासाठी सतत तगादा लावत होती. मात्र, काही कारणास्तव पती तिला मोबाईल घेऊन देऊ शकला नाही. पतीकडून मोबाईल मिळत नसल्याने प्राजक्ता प्रचंड नाराज होती. याच रागातून आणि नैराश्यातून तिने आपल्या पोटच्या गोळ्याला, म्हणजेच तीन वर्षीय वेदांत दराडे याला सोबत घेतले आणि विहिरीकडे धाव घेतली.

## बिल्डरने स्वत:वर गोळी झाडली

**सुरत :** गुजरातच्या डायमंड सिटी असलेल्या सुरत येथे एक अशी घटना घडली ज्याने संपूर्ण शहर हादरुन गेलं. येथील प्रसिद्ध रिअल इस्टेट व्यवसायिक आणि जॉली ग्रूपचे सर्वेसर्वा असलेले तुषार घेलाणी यांनी शनिवारी रात्री उशिरा आपल्या घरातच स्वत:वर गोळी झाडून घेत जीव देण्याचा प्रयत्न केला. घरात त्यांच्या मुलीच्या लग्नाची तयारीची धामधूम सुरु असताना ही घटना घडल्याने सर्वांना धक्का बसला आहे. त्यांना



तात्काळ गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आलं. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, ही घटना सिटीलाईट परिसरातील तुषार घेलाणी यांच्या राहत्या घरात घडली आहे. रविवारी पहाटे सुमारे दोन वाजता त्यांनी स्वत:वर गोळी झाडून घेतली. तुषार घेलाणी यांनी आपल्या लायसन्स रिव्हॉल्वरने स्वत:वर गोळी झाडून घेतली. रात्री अचानक गोळी चालण्याचा आवाज आल्याने कुटुंबीय घाबरुन उठले. त्यांनी तात्काळ आवाजाच्या दिशेने धाव घेतली, जेव्हा ते खोलीत पोहोचले तेव्हा त्यांना तुषार घेलाणी हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळून आले. हे पाहून कुटुंबीयांना धक्काच बसला. त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना एअर रुग्णवाहिकेने मुंबईतील रुग्णालयात हलवण्याची तयारी केली जात आहे.धक्कादायक बाब म्हणजे, ५ फ ब्रुवारीला तुषार घेलाणी यांच्या मुलीचं लग्न होतं. रविवारपासून तिच्या लग्नाच्या विधींना सुरुवात होणार होती. घराच्या अंगणात मांडव टाकण्यात आला होता. नातेवाईक, पाहुणे येऊ लागले होते. पण, या घटनेने या आनंदाच्या क्षणांवर विरजन पडलं आहे.या घटनेनंतर घराची सजावट आणि मांडव काढला जात आहे. तसेच, पोलिसही घरी पोहोचले असून तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

## गर्भवती बहिणीसह आई-वडिलांना संपवून घरातच पुरलं ; काकाने दिली आयडिया

**बंगळुरु :** एका तरुणाने त्याच्या आई-वडिलांची आणि बहिणीची हत्या केली. त्यानंतर त्यांचे मृतदेह घरातच पुरले. ही घटना २७ जानेवारीला बंगळुरुच्या विजयनगर येथील कोट्टुरु येथे घडली. जेव्हा हा तरुण पोलिसांना शरण आला तेव्हा हे तिहेरी हत्याकांडाचं भयंकर प्रकरण उघडकीस आलं. विजयनगर जिल्ह्यातील कोट्टुरू येथे घडलेल्या तिहेरी हत्याकांडात बेंगळुरू पोलिसांनी धक्कादायक उलगडा केला आहे. बहिण लग्नाआधीच गर्भवती असल्याच्या रागातून या तरुणाने तिची हत्या केल्याचं समोर आलं आहे. तसेच, आई-वडिलांनी बहिणीला पाठिंबा दिला, त्यामुळे त्याने त्यांचीही हत्या केली. पोलिस चौकशीदरम्यान, आरोपी अक्षयने त्याच्या कुटुंबाच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी हा गुन्हा केल्याची कबुली दिली.याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीची १८ वर्षांची लहान बहीण अमृता तीन



महिन्यांची गर्भवती होती. ही बातमी कळताच तो संतापला. पोलिसांना असा संशय आहे की त्याच्या बहिणीचा प्रियकर हा वेगळ्या समुदायाचा असणे हे देखील या हत्येमागील एक कारण असू शकते.चार म हिन्यांपूर्वी आरोपी भावाने त्याची बहिण अमृताचा म ोबाईल फोन तपासला तेव्हा त्याला आढळले की ती पीयूसीमध्ये शिकणाऱ्या एका तरुणाशी सतत संपर्कात होती. नंतर, अक्षयने त्या तरुणाला फोन केला, तेव्हा त्याला कळले की त्यांच्यात प्रेमसंबंधात आहेत. संतापलेल्या अक्षयने त्याच्या बहिणीला मारहाण केली आणि धमकी दिली. अमृताने नंतर माफी मागितली आणि सांगितले की त्यांच्यात असं काही नाही. पण, २६ जानेवारी रोजी ती गर्भवती असल्याचे उघड झाले. तेव्हा अक्षयने तिला गर्भपात करण्यास सांगितलं. पण, त्यासाठी त्याच्या आई-वडिलांनी नकार दिला. याच गोष्टीने संतापून त्याने बहिण आणि आई-वडिलांची हत्या केली. आरोपीने त्याच्या गुन्ह्याची कबुली दिली आहे.पोलिस तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, अक्षयने २६ जानेवारीला आधी आईची हत्या केली. हत्येनंतर, त्याने आंघोळ केली आणि रक्ताने माखलेले कपडे नष्ट केले. त्याच संध्याकाळी त्याची बहीण घरी परतल्यावर त्याने तिलाही संपवलं आणि तिचा मृतदेह आईच्या मृतदेहाजवळ ठेवला. त्याने पुन्हा आंघोळ केली. त्यानंतर तो रात्री साडे दहाच्या सुमारास दारू पिऊन घरी परतला आणि सोफ्यावर बसलेल्या त्याच्या वडिलांचा गळा चिरत त्यांची हत्या केली. वडिलांचा मृतदेह आई आणि बहिणीच्या मृतदेहांजवळ ठेवला, नंतर खोलीला कुलूप लावले. त्याने पुन्हा आंघोळ केली आणि कपडे बदलले.दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या आई आणि बहिणीचे मोबाईल फोन घेऊन बंगळुरूला गेला. तर त्याने आपला फोन घरीच ठेवला. या दरम्यान, त्याने जयदेव रुग्णालयाजवळ त्यांचा फोटो काढला आणि तो त्याच्या मोबाईल फोनवर पाठवला. त्यानंतर त्याने दोन्ही मोबाईल फोन रुग्णालयाजवळील कचऱ्याच्या डब्यात फेकले. त्यानंतर, तो काका वसंत यांना भेटला आणि त्यांना सर्व काही सांगितले.

# पाकिस्तानला रोखत भारतसेमी फायनलमध्ये



**बुलोवायो/वृत्तसंस्था :** भारताने पाकिस्तानची जगासमोर जिरवली आणि १९ वर्षांखालील वर्ल्ड कपमध्ये दिमाखात प्रवेश केला. पण आता भारताचा वर्ल्ड कपमध्ये सेमी फायनलचा सामना कोणत्या देशाबरोबर होणार आहे, याचे समीकरण आता समोर आले आहे.भारताने या वर्ल्ड कपमध्य दिमाखदार कामगिरी केली. वर्ल्ड कपच्या साखळी स्पर्धेत भारताने सर्व सामने जिंकले आणि सुपर सिक्स फेरीत प्रवेश केला. या फेरीत भारताचा पाकिस्तानबरोबर चौथा सामना होता, यापूर्वीचे तिन्ही सामने भारताने जिंकले होते. भारतासाठी पाकिस्तानचा सामना निर्णायक होता. भारताची बाजू या सामन्यात पाकिस्तानपेक्षा सरस होती. कारण भारताचा रन रेट हा +३.३३७ एवढा होता, तर पाकिस्तानचा रन रेट हा + १.४८४ एवढा होता. भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना २५२ धावा केल्या होत्या. त्यामुळे पाकिस्तानला विजयासाठी २५३ धावा करायच्या होत्या, पण जर त्यांना सेमी फायनमध्ये पोहोचायचे असेल तर त्यांना ही धावसंख्या ३३.३ षटकांत करायची होती. पण पाकिस्तानला ३३.३ षटकांत २५३ धावा करता आल्या नाहीत आणि भारताने वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये झोकात प्रवेश केला. त्यानंतर भारताने ५८ धावांनी हा सामान जिंकला.भारताने पाकिस्तानवर सुपर सिक्सच्या सामन्यात दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे भारत आता त्यांच्या गटात अव्वल ठरला आहे. समोरच्या गटात ऑस्ट्रेलियाचा संघ अव्वल स्थानावर आहे, तर अफगाणिस्तानचा संघ हा दुसऱ्या स्थानावर आहे. भारताचा सामना हा समोरच्या गटातील दुसऱ्या स्थानवर असलेल्या संघाशी होणार आहे. त्यामुळे या वर्ल्ड कपमधील पहिला सेमी फायनलचा साम ना हा ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात खेळवला जाणार आहे. त्यानंतर या वर्ल्ड कपमधील दुसरा सामना हा भारतआणि अफगाणिस्तान यांच्यात खेळवला जाणार आहे. भारताने जर या सामन्यात विजय मिळवला तर ते थेट फायनलमध्ये एंट्री करणार आहेत.

भारभारताने आता दिमाखात वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे आता भारत या सामन्या कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## पाकिस्तान सरकारचा भारतामधील वर्ल्ड कपबाबत मोठा निर्णय, संपूर्ण स्पर्धेवर बहिष्कार नाही पण..

**कराची :** भारत यजमान असलेला टी २० वर्ल्ड कप खेळायचा की नाही, याबातचा निर्णय पाकिस्तानचे सरकार घेणार होती. पाकिस्तान वर्ल्ड कपवर बहिष्कार घालणार कीखेळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. पण अखेर पाकिस्तानच्या सरकारने हा मोठा निर्णय आता जाहीर केला आहे.बांगलादेशला मदत करण्यासाठी पाकिस्तान पुढे सरसावली होती. पाकिस्तानने बांगलादेशला हमी दिली होती की, आम्ही तुमच्याबरोबर आहोत. त्यामुळे बांगलादेशने भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला होता. पण बांगलादेशला त्यानंतर कळून चुकले की, आपण आपल्याच पायावर धोंडा मारून घेतला आहे. कारण पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाने कोणताच निर्णय घेतला नव्हता, उलट त्यांनी वर्ल्ड कपसाठी आपला संघ जाहीर केला होता. मोहसिन नक्वी यांनी त्यानंतर एक मोठी चाल खेळली आणि त्यांनी हे प्रकरण पाकिस्तानच्या पंतप्रधानांकडे नेले. पाकिस्तानचे पंतप्रधान याबाबत अंतिम निर्णय घेतील, असे मोहसिन नक्वी यांनी सांगितले होते. पाकिस्तानच्या सरकारने अखेर आता भारत यजमानपद भूषवणारा वर्ल्ड कप खेळायचा की नाही, याबाबतचा निर्णय घेतला आहेपाकिस्तानच्या सरकारला मोहसिन नक्वी यांनी तीन पर्याय सुचवले होते. त्यामधील पहिला हा संपूर्ण वर्ल्ड कपवर बहिष्कार घालण्याचा होता, तर दुसरा फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार घालण्याचा होता, तर तिसरा भारताविरुद्धच्या सामन्यात



काळी पट्टी बांधून निषेध करण्याचा होता. यावेळी पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी दुसरा पर्याय निवडला आहे. त्यामुळे आता पाकिस्तानच्या सरकारने टी २० वर्ल्ड कपवर संपूर्ण बहिष्कार घातलेला नाही, तर त्यांनी फक्त भारताविरुद्धच्या सामन्यावरच बहिष्कार घातला आहे. त्यामुळे आता पाकिस्तान वर्ल्ड कपमध्ये आपेल सामने खेळेल, पण अपवाद हा फक्त भारताच्या सामन्याचा असेल. त्यामुळे आता पाकिस्तानच्या सरकारने हा निर्णय घेत आयसीसीला कोंडीत पकडण्याचा निर्णय घेतल्याचे समोर आले आहे.पाकिस्तानने संपूर्ण वर्ल्ड कपवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला नाही, तर त्यांनी फक्त एकच सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता यावर आयसीसी नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागलेले असणार आहे.

## केएलची रणजी स्पर्धेत भन्नाट कॅच

**नवी दिल्ली :** राहुल आता रणजी ट्रॉफी स्पर्धा खेळत असल्याचे समोर आले असून या सामन्यात एक अफलातून कॅच त्योन पडल्याचे पाहायला मिळत आहे. राहुलच्या या कॅचचा व्हिडिओ आता जगभरात चांगलाच व्हायरल झाला आहे.ही गोष्ट घडली ती ९४ व्या षटकात. पंजाब आणि कर्नाटक यांच्यात हा सामना होता. षटकाच्या चौथ्या चेंडूवर ही भन्नाट कॅच पाहायला मिळाली. पाटीलच्या गोलंदाजीचा सामना यावेळी पंजाबचा फलदाज आयुश गोयल करत होता. आयुश यावेळी चांगल्या लयीत दिसत होता. त्याम ळे त्याला बाद करणे पंजाबसाठी सर्वात म हत्वाचे होते. त्यासाठी कर्नाटकच्या संघाने पहिली स्लीप लावली होती, पण दुसरी स्लीप मात्र त्यांनी लावली नव्हती. यावेळी आयुश गोयलच्या ऑफ स्टम्पच्या बाहेर पाटीलने चेंडू टाकला होता. या चेंडूवर ऑफ साईडला मोठा फटका मारण्यासाठी आयुश गोयल दिसत होता. पण यावेळी चेंडू चांगलाच स्विंग झाला आणि त्याची



बॅटची कडा लागली आणि तो दुसऱ्या स्लीपच्या दिशेने जायला लागला.हा चेंडू आता चौकार जाईल, असे वाटत होते. कारण दुसरी स्लीप लावलीच नव्हती. पहिल्या स्लीपमध्ये राहुल उभा होता. राहुल हा एक चाणाक्ष खेळाडू आहे. राहुलला हा चेंडू नेमका कुठे जाणार, हे दिसत होते. त्यामुळे राहुलने यावेळी चेंडूचा अंदाज घेतला, तो नेमका किती वेगाने येणार, हे पाहिले आणि जेव्हा चेंडू त्याच्या बाजूने जाणार एवढ्यातच राहुलने यावेळी हवेत उडी घेतली आणि एक अप्रतिम झेल त्याने यावेळी पकडला. राहुलने यावेळी हवेत उडी घेतली आणि त्यानंतर आपले जोन्ही हात चेंडूच्या दिशेने नेले त्यानंतर राहुलने तो चेंडू आपल्या हातात अलगदपणे झेलला.

# आयसीसीने पाकची जगासमोर लाज काढली, म्हणाले पाकिस्तानच्या निर्णयाचा आदर करत असलो तरीही..

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पाकिस्तानने वर्ल्ड कपमधील फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार टाकत आयसीसीला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. पण आता या प्रकरणावर आयसीसीची पहिली प्रतिक्रिया आली आहे आणि ती जोरदार व्हायरल झाली आहे. कारण आता आयसीसीने पाकिस्तानची जगासमोर लाज काढली आहे. आयसीसीने हे प्रकरण गंभीरपणे घेतले असून त्यांनी पाकिस्तानला चांगलेच धारेवर धरलेले आहे.आयसीसीने याबाबतएक पत्रक काढले आहे. या पत्रकात आयसीसीमे म्हटले आहे की, ' आयसीसी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाकडून (पीसीबी) अधिकृत संवादाची वाट पाहत असताना, निवडक सहभागाची ही भूमिका घेणे हे कोणत्याही देशासाठी योग्य नाही.





त्यामुळे जागतिक क्रीडा स्पर्धेच्या मूलभूत तत्त्वाशी जुळवून घेणे कठीण होऊन बसू शकते. जेव्हा वर्ल्ड कपचा विचार केला जातो तेव्हा तिथे सर्व पात्र संघांनी स्पर्धेच्या वेळापत्रकानुसार समान अटींवर स्पर्धा करणे अपेक्षित असते. एकाच देशाबरोबर खेळायचे नाही हा निर्णय स्पर्धांची भावना आणि पावित्र्य कमी करतो. आयसीसी राष्ट्रीय धोरणांच्या बाबतीत सरकारांच्या भूमिकांचा आदर करत असली तरी, हा निर्णय जागतिक खेळाच्या किंवा पाकिस्तानमधील लाखो लोकांसह जगभरातील चाहत्यांच्या हिताचा नाही. आयसीसीला आशा आहे की पीसीबी आपल्या देशातील क्रिकेटवर होणाऱ्या महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन परिणामांचा विचार करेल, कारण याचा जागतिक क्रिकेटवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे, ज्याचा तो स्वतः एक सदस्य आणि लाभार्थी आहे. आयसीसीचे प्राधान्य आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषकाचे यशस्वी आयोजन करणे हेच आहे, जी पीसीबीसह सर्व सदस्यांची जबाबदारी देखील असायला हवी. आयसीसीला अपेक्षा आहे की पीसीबी सर्व देशांचे हित जपेल असा परस्पर स्वीकारार्ह तोडगा काढेल. ' आयसीसीने यावेळी पाकिस्तानला स्पष्टपणे सांगितले आहे की, तुमच्या सरकारच्या निर्णयाचा आम्ही आदर करत आहोत. पण या बहिष्काराच्या निर्णयानंतर तुमच्या क्रिकेटवर जो काही परीणाम होईल, त्यासाठी आम्ही जबाबदार असू शकणार नाही. कारण आयसीसीच्या परवानगी शिवाय कोणताही देश पाकिस्तानशी खेळू शकणार नाही. त्यामुळे आयसीसीच्या या वक्तव्यानंतर पाकिस्तान वठणीवर येईल, असे म्हटले जात आहे.पाकिस्तानने यावेळी फक्त भारताच्या सामन्यावर बहिष्कार घातला. पण आयसीसीने आपल्या पहिल्याच प्रतिक्रियेत पाकिस्तानला चांगलेच फटकारले आहे,

# राकेश बापटच्या आधी या सेलिब्रिटीच्या प्रेमात आकंठ बुडाली होती शामिता शेट्टी

**मुंबई :** बॉलिवूडमध्ये दोन भावंड काम करत असली तरी त्या दोघांचेही नाणे खणखणीत वाजतेच असे नाही. एकजण सुपरहिट होतं तर एक जण फ्लॉप. अशीच एक जोडी म्हणजे शिल्पा शेट्टी आणि शमिता शेट्टी . आज अभिनेत्री शमिता शेट्टीचा वाढदिवस आहे. ती आज ४८ वर्षांची झाली आहे.सलमान खानच्या बिग बॉस १५ मधील स्पर्धक असलेल्या शमिताने २००० साली यश चोप्रा यांच्या 'मोहब्बतें' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले, तेव्हा लोकांना असे वाटलेले की ती भविष्यात अनेक चित्रपटांमध्ये दिसेल, परंतु तसे झाले नाही. तिची चित्रपट कारकीर्द विशेष प्रभावी नव्हती.शमिता हीचा जन्म मंगलोर येथे झाला. तिने सेंट अँथनी गर्ल्स हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर तिने मुंबईतील सिडेनहॅम कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. तिच्या पदार्पणाच्या चित्रपटासाठी शमिताला आयफा बेस्ट डेब्यू ॲक्ट्रेस अवॉर्ड मिळाला होता. शमिता शेट्टी बऱ्याच काळापासून बॉलिवूडमध्ये आहे, पण ती अभिनेत्रीपेक्षा शिल्पा शेट्टीची बहीण म्हणूनच जास्त ओळखली गेली.माध्यमांमध्ये शमिता शेट्टी आणि मनोज बाजपेयी यांच्यात अफेअर असल्याच्या अफवाही पसरल्या होत्या. ती मनोज बाजपेयीसोबत 'फरेब' आणि 'बेवफा' या चित्रपटांमध्ये दिसली होती. विवाहित अभिनेत्यासोबतच्या तिच्या अफेअरमुळे वाद निर्माण झाला. असेही म्हटले जात होते की शमिताने मनोज बाजपेयीशी लग्न न होऊ शकल्यामुळे इतर कोणाशीही लग्न केले नाही. पण दोघांपैकी कोणीही यावर कधीही भाष्य केले नाही. शिवाय, शमिताचे हरमन बावेजा आणि आफताब शिवदासानी यांच्याशी अफेअर असल्याची अफवा पसरली होती.शमिता अजून लग्न झालेली नाही. ती बिग बॉस ओटीटीवर मराठी अभिनेता राकेश बापटला भेटली आणि घराबाहेर पडल्यानंतर त्यांनी त्यांचे नाते जग जाहिर केले. शमिता बिग बॉसमध्ये परतली तेव्हा राकेशने तिला पूर्ण पाठिंबा दिला. शिल्पा शेट्टीच्या अनेक कार्यक्रमांमध्ये राकेश शमितासोबत आवर्जून उपस्थित राहत होता. पण कालांतराने त्यांच्यातही बिनसले. त्यांनी सोशल मीडियावर त्यांचे ब्रेकअप झाल्याचे जाहिर केले. ब्रेकअनंतरही दोघे एका गाण्यात दिसले होते. हिंदी चित्रपटांव्यतिरिक्त, शमिता अनेक तमिळ आणि तेलुगू चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. ती 'बिग बॉस,' 'झलक दिख लाजा,' आणि 'खतरों के खिलाडी' सारख्या शोमध्ये देखील दिसली आहे. शमिता शेट्टी बिग बॉस १५ मध्ये टॉप ४ स्पर्धक होती. तर राकेश बापट सध्या बिग बॉस मराठी ६ मध्ये स्पर्धक म्हणून दिसत आहे.



## आडमुठेपणा पडला महागात, 'या' स्पर्धकाला मिळाला नारळ ; दुसऱ्या आठवड्यातच बिग बॉसच्या घराबाहेर जाण्याची आली वेळ



**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ 'च्या आजच्या एपिसोडमध्ये रितेश सुरुवातीला प्रभूला सुनावतो. त्याचबरोबर विशाललाही धारेवर धरतो. टास्कवरून रितेश सागरला सुनावतो. सागर त्याचा मुद्दा स्पष्ट करतो. रितेश सागरला म्हणतो, 'तुम्ही सोयीनुसार आवाज चढवता' प्रभूला डिवचण्यावरून रितेश इतर स्पर्धकांना सुनावतो. 'जर कोणाला गेम समजत नसेल तर आपल्याकडे कॉन्टेन्ट कोच आहेत, सोनाली. त्यानं विचारा' असं रितेश म्हणतो. पुढे रतेश तन्वीला ती स्वतः च्याच चारित्र्यवरून बोलल्यावरून तिला सुनावतो. रितेश, नॉमिनेटेड असलेल्या आठ स्पर्धकांना समोर बसायला सांगतो. त्यापैकी प्रभू आणि दीपाली सेफ असल्याचं रितेश सांगतो. दीपाली आणि प्रभूला खूप आनंद होतो. राकेश, दीपालीची समजूत काढतो.रितेश स्पर्धकांचा टास्क घेतो. मुलं विरुद्ध मुली अशी टीम असते. रितेश प्रभूला मुलींच्या टीममध्ये यायला सांगतो. ईमोजीवरून गाणी ओळखण्याचा टास्क असतो. रितेश, प्रभूची खिल्ली उडवतो. प्रत्येक टास्कमध्ये प्रभू मनसोक्त नाचतो. या टास्कमध्ये मुलीची टीम जिंकते. पुढे, रितेश आयुषला कलाकार कट्ट्यावर बोलावतो. आयुष, हृतिक रोशनची ॲक्टिंग करतो. आयुष, विशालची खिल्ली उडवतो. संपूर्ण घरात हशा पिकतो. पुढे, रितेश आयुषला डान्स करायला सांगतो. दीपाली आयुषचं कौतुक करते. पुढे, कलाकार कट्ट्यावर सागर येतो. सागर कारंडे रामदास आठवले यांची मिमिक्री करतो.रितेश पुढे बुद्धिबळाचा टास्क घेतो. पहिले, रितेश अनुश्रीला बोलावतो. रितेश, स्पर्धकांना राजा, वजीर, उंट, घोडा, हत्ती, प्यादा या सोंगट्यांचं महत्व सांगतात. अनुश्रीला स्वतःला उंट म्हणते. म्हणजे, कायम वाकड्यात जाणारी. अनुश्री, सागरला राजा म्हणते. अनुश्री, वजीरचं पद विशालला देते. पुढे, अनुश्री घोड्याचं पद देते. 'आधी ती आमच्यासोबत होती आणि आता ती दुसरीकडे गेलीये' असं अनुश्री म्हणते. हत्तीचं पद अनुश्री रुचिताला देते. शेवटी, अनुश्री प्यादाचं पद आयुषला देते. रितेश पुढे करणला बोलावतो. तो स्वतःला वजीर म्हणतो. हत्तीचं पद करण, रोशनला देतो. प्यादा म्हणून करण ओमकारची निवड करतो. राजा म्हणून करण प्राजक्ताची निवड करतो. उंट म्हणून करण सोनालीला निवडतो. शेवटी, घोडा म्हणून करण दीपालीची निवड करतो.स्पर्धकांना नावडत्या स्पर्धकाचा फोटो घेऊन कारण सांगत चुलीत घालायचा असतो. राकेश, अनुश्रीचं वागणं पटत नसल्यामुळे तिला चुलीत घालतो. तन्वी, सोनालीला चुलीत टाकते. विशाल, त्याला राकेशचा गेम आवडत नाही म्हणून राकेशचा फोटो चुलीत टाकतो. दीपाली, दिव्याचा फोटो चुलीत घालते. प्रभू, सागरचा फोटो चुलीत टाकतो. सोनाली लावालावी करते म्हणून रोशनसुद्धा सोनालीचा फोटो चुलीत घालतो.

## प्रियदर्शिनी इंदलकरने सांगितलं ब्रेकअपचं कारण ; म्हणाली, तो माझ्यापेक्षा वयाने मोठा

**मुंबई :** मराठी अभिनेत्री प्रियदर्शिनी इंदलकरला 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या लोकप्रिय कार्यक्रमातून प्रसिद्धी मिळाली. प्रियदर्शिनीचा मोठा चाहतावर्ग आहे. प्रियदर्शिनीनं २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दशावतार' या सिनेमामध्ये भूमिका साकारलेली. या भूमिकेसाठी प्रियदर्शिनीचं कौतुक झालं. अशातच आता प्रियदर्शिनी पुन्हा 'लग्नाचा शॉट' या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमाच्या निमित्तानं अभिनेत्री अनेक माध्यमांना मुलाखत देतेय. अशाच एका कार्यक्रमादरम्यान प्रियदर्शिनीनं तिच्या ब्रेकअपचा खुलासा केला आहे. प्रियदर्शिनी इंदलकर आणि अभिजित आमकर यांनी प्रणित मोरेच्या स्टॅन्डअप कॉमेडी शोला हजेरी लावलेली. यादरम्यान प्रणितने प्रियदर्शिनीला, 'तू सिंगल आहेस का?' असं विचारलं. त्यावर अभिनेत्री 'हो' म्हणाली. पुढे, प्रणितने तिला शेवटचं रिलेशनशप आणि ब्रेकअपबद्दल विचारलं. त्यावर प्रियदर्शिनीनं सांगितलं की, तिचा एप्रिल २०२५ मध्ये ब्रेकअप झालेला. पुढे ब्रेकअपचं कारण सांगताना प्रियदर्शिनी म्हणाली की, 'जुळलं नाही. आमच्यात कॉम्पॅटिबिलिटी नव्हती.' पुढे प्रणितने तिला रिलेशनशिप टॉक्सिक होतं का? असं विचारलं. त्यावर प्रियदर्शिनी म्हणाली, 'नाहीः तो किंवा मी टॉक्सिक नव्हतो. पण आमचं रिलेशनशिपच टॉक्सिक झालं होतं.' ब्रेकअपचा निर्णय कोणाचा होता? यावर प्रियदर्शिनी म्हणाली, 'त्याला लवकर लग्न करायचं होतं. कारण तो माझ्यापेक्षा वयाने मोठा होता आणि मला घाई नव्हती. यावरून आमच्यात वाद सुरू झाले आणि मग त्यामुळे ते जमून आलं नाही.'तुला इन्स्टाग्रामवर लग्नासाठी विचारतात का?' असं विचारलं असता प्रियदर्शिनी म्हणाली की, 'मला मेल करतात. तीन-चार वर्षांपूर्वी ई-मेलवर एका माणसाने मला त्याचा बायोडाटा पाठवला होता. तो तेव्हा ३५ वर्षांचा होता आणि मी २४-२५ वर्षांची होते. त्यात त्याने घर या ठिकाणी आहे, प्रॉपर्टी आहे, लग्नानंतर आपण इथे राहू, लग्न कुठे होईल, नोकरी कोणती करतो, किती कमावतो असं त्याने बरंच काही सांगितलेलं.'दरम्यान, 'लग्नाचा शॉट' या सिनेमाबद्दल सांगायचं तर, या सिनेमात प्रियदर्शिनीसोबत अभिजित आमकरसुद्धा मुख्य भूमिकेत आहे.

## श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा येथे पालक मेळावा संपन्न !

# विद्यार्थी - शिक्षकांची नाळ पालकांशी जोडण्याचा स्तुत्य प्रयत्न..

**जनसंचलन/ नांदुरा**


श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा (रेल्वे) पालक मेळाव्याचे आयोजन करून विद्यार्थी - प्राध्यापकांची पालकांशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला असून आपला पाल्य ज्या महाविद्यालयातून शिक्षण घेत आहे तेथे विद्यार्थ्यांना दिले जात असलेले शिक्षण कसे दिले जाते तसेच पालक - विद्यार्थी यांचे शैक्षणिक हक्क आणि जबाबदारीवर भर देण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत हे होते, प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य शामकांत काळवीट आणि प्रा. प्रकाश तायडे लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग (आय. क्यू. ए. सी.) समन्वयक डॉ. स्मिता तराळे यांनी केले.त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमाबाबत तसेच महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध सोयी- सुविधांबाबत सविस्तर माहिती दिली. पालक मेळाव्याला उपस्थित काही पालकांनी या कार्यक्रमात प्रतिनिधिक मनोगत व्यक्त करतांना आपल्या पाल्याला महाविद्यालयात मिळत असलेल्या पुस्तकी ज्ञानासोबतच सामाजिक जीवनात जगत असताना आवश्यक असलेल्या जीवनावश्यक मूल्यांना वाव देण्यासाठी राबवत असलेल्या उपक्रमाबाबत आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या जीवनात होत असलेल्या सकारात्मक बदलासाठी महाविद्यालयाचे आभार मानले. यावेळी महाविद्यालयाद्वारे विविध शैक्षणिक उपक्रमात सहभाग घेण्यासाठी बारामती, अमरावती, नाशिक इत्यादी ठिकाणी पाठविलेल्या विद्यार्थ्यांपैकी यशप्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रतिनिधिक मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाप्रती आपल्या भावना पालकांसमोर व्यक्त केल्यात. महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्रा. डॉ. अलका मानकर यांनी पालकांशी हितगुज करत पालक विद्यार्थी संबंधावर विचार व्यक्त करून पालकांनी देखील आपल्या पाल्यांच्या जडणघडणीवर लक्ष ठेऊन त्यांना नवनवीन उपक्रम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले आहे. प्रमुख वक्ते प्रा. प्रकाश तायडे यांनी विद्यार्थी आणि पालकांच्या जबाबदारीवर मार्गदर्शन केले तर दुसरे प्रमुख वक्ते प्राचार्य शामकांत काळवीट यांनी शाळा आणि महाविद्यालयातूनच देशाला आवश्यक असलेलं मनुष्यबळ निर्माण केले जात असल्याचं सांगून शिक्षणाचे महत्व विषद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांनी केले आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयात पालक मेळावा आयोजित करून पहिलाच प्रयोग केला असल्याचं सांगितलं.केवळ देशाचे स्थूल उत्पादन (जोडपी) वाढले म्हणजे देशाचा विकास होत नाही तर त्या देशातील लोक किती आनंदी आहेत यावरून देशाचा विकास किती झाला हे ठरत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडवत असतांना प्राध्यापकांबरोबर पालकांनी देखील जागरूक राहून आपला पाल्य कसा घडत आहे याकडे लक्ष दिलं तर विद्यार्थी घडून पिढ्या घडतील आणि पर्यायाने देशाला त्याचा फायदा होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांचे देखील योगदान असावे असे आवाहन केले. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या समन्वातूनच अध्ययन - अध्यापनाची प्रक्रिया सुरळीत चालते असे त्यांनी सांगितले.

# ₹२० हजार द्या, ₹२ लाख घ्या खोट्या स्वप्नांची फॅक्टरी बंद!

## १५ वर्षीय युट्युबरला गंडवण्याचा प्रयत्न; मलकापुर पोलिसांनी चिल्ड्रन बँकफटोळी पकडली!

**जनसंचलन/मलकापुर**

सोशल मीडियावर ₹२० हजार द्या, ₹२ लाख मिळवाफ अशा भुलथापा देत नागरिकांची फसवणूक करणाऱ्या तथाकथित चिल्ड्रन बँक टोळीचा मलकापुर शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे या टोळीच्या जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न थेट एका १५ वर्षीय युट्युबरवर करण्यात आला होता. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास मलकापुर बसस्टँड परिसरात गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि दीपक वारे, पोशि आसीफ शेख, पोशि सुरज चौधरी पेट्रोलिंग करीत असताना संशयास्पद स्थितीत फिरणारा एक अल्पवयीन मुलगा आढळून आला. चौकशीत त्याने स्वतः



चे नाव यश मदनलाल गढरीया (वय १५, रा. दिल्ली) असल्याचे सांगितले. इंस्टाग्रामवरील एका रीलद्वारे ₹२० हजारांच्या बदल्यात ₹२ लाख देण्याचे आमिष दाखवण्यात आले असून, त्या रीलमधील मोबाईल क्रमांकावरून संपर्क साधल्यानंतर मलकापुरात येण्यास सांगण्यात आल्याची धक्कादायक माहिती त्याने दिली. युट्युबर असल्याने हा प्रकार उघड करण्याच्या उद्देशाने तो मलकापुरात आला होता. पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार सापळा रचण्यात आला. बसस्टँड मागील गल्लीत तोंडाला रुमाल बांधून आलेल्या दोन युवकांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आनंद संतोष इंगळे (वय २३) व रोहित रतन महाले (वय २२, दोन्ही रा. भिमनगर, मलकापुर) अशी आहेत. चौकशीत आरोपींनी ₹२० हजार घेऊन ङ्गचिल्ड्रन बँकफचे ₹२ लाख देण्याच्या नावाखाली फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२), ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ग्रामस्थ आले अन् बीडीओ पळाल्या!

## देऊळघाट प्रकरणात चौकशी सिद्ध, आदेश लेखी तरीही कारवाई शून्य; कुणाच्या आशीर्वादाने दोषी मोकाट?

**जनसंचलन/बुलढाणा**



चौकशीत दोषी आढळूनही ग्रामसचिव व सरपंचावर तब्बल दोन वर्षांपासून कोणतीही कारवाई न झाल्याने देऊळघाट ग्रामपंचायतीतील नागरिकांचा संताप अखेर उफाळून आला आहे. आज सकाळी ११ वाजता बुलढाणा गट विकास अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी ग्रामस्थ कार्यालयात धडकले असता, ग्रामस्थांना पाहताच गट विकास अधिकारी अमिता अजित पवार यांनी कार्यालय सोडून पलायन केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट ग्रामपंचायतीत १५व्या वित्त आयोगातील निधी ग्रामसचिव रजेवर असतानाही सरपंच व सचिव यांनी संगनमताने अवैधरित्या काढून खर्च केल्याचा गंभीर आरोप आहे. याबाबत ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर झालेल्या चौकशीत आरोप सिद्ध झाले. जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दोषी ग्रामसचिव व सरपंचावर कारवाई करण्याचे लेखी आदेश गट विकास अधिकाऱ्यांना दिले. मात्र, हे आदेश धूळखात पडून राहिले असून आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. याच प्रशासनिक दिरंगाई आणि संरक्षणामुळे संतप्त ग्रामस्थांनी आज गट विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले. अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीतही गेल्या आठ तासांपासून ग्रामस्थ दालनात ठामपणे ठिय्या देऊन बसले आहेत. जोपर्यंत दोषींवर कारवाई होत नाही आणि गट विकास अधिकारी कार्यालयात येऊन जाब देत नाहीत, तोपर्यंत ठिय्या सुरूच राहील, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. चौकशी अहवाल, लेखी आदेश असूनही कारवाई न होणे आणि अधिकाऱ्यांचे पलायन हे प्रशासनाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. आता जिल्हा प्रशासन याची दखल घेऊन तात्काळ कारवाई करणार का, की दोषींना अभय देण्याची परंपरा कायम राहणार, असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत.

## पाच प्रवासी गंभीर, रुग्णालयात तातडीने हलवले

# समृद्धी महामार्गावर अपघात थांबत नाहीत कारण काय?

**जनसंचलन/ बुलढाणा**



राज्याचा महत्त्वाकांक्षी समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा अपघाताच्या बातमीने हादरला आहे. मुंबई कॉरिडॉरवरील चॅनेज नंबर ३०९ येथे आज दुपारी २:३० वाजताच्या सुमारास वेगाचा कहर पाहायला मिळाला. होंडा सिटी कार थेट डिव्हायडरला धडकली आणि काही क्षणांतच महामार्गावर भीषण दृश्य निर्माण झाले. या अपघातात कारमधील पाचही प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त वाहन होंडा सिटी ( ०१ ९९९५ / ०१ १११ माहितीप्रमाणे) असून त्यात एकूण पाच जण प्रवास करत होते. अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचली, हेच या घटनेत दिलासादायक ठरले. वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक पिसे, पायलट प्रदीप पडघाण, पवन गाडेकर, गोपाल वानखेडे तसेच डॉ. मंगेश काळे आणि पायलट पांचाळ यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने मेहकर येथील सहयोग हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले असून सर्वांवर उपचार सुरू आहेत.

# दुपारी शेतात गेले रात्री विहिरीत सापडले; शिक्षकाचा मृत्यू

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील हराळखेड येथे हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. जिल्हा परिषद वैरागड शाळेवर कार्यरत असलेले शिक्षक श्रीकिशन भगवान येवले (वय ५३) यांनी स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. काल दि. ०१ फब्रुवारी रोजी दुपारी सुमारे ३ वाजता श्रीकिशन येवले शेतात गेले होते. संध्याकाळपर्यंत घरी न परतल्याने नातेवाईकांनी शोधमोहीम राबवली. अखेर रात्री सुमारे २ वाजता त्यांचा मृतदेह विहिरीत आढळून आला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून शिक्षकवर्गात शोककळा पसरली आहे. मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, चिखली येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आला आहे. आत्महत्येमागचे कारण अद्याप अस्पष्ट असून पुढील तपास दिलीप तांडे (अमडापूर पोलीस) करीत आहेत. कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



# त्या अपघातातील जखमी महिलेचा मृत्यू...

जनसंचलन/किनगाव जट्टू

येथून मातमळकडे नेटशेड हाउसमध्ये कामासाठी मजुरांना घेऊन जाणाऱ्या ऑटो व कारची रविवारी सकाळी धडक झाल्याने अपघातात एका महिला मजुराचा मृत्यू तर आठ महिला गंभीर जखमी झाल्या होत्या. दरम्यान, गंभीर जखमी झालेल्या रंजना कास्तोडे (५३) यांचा रविवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास उपचाराच्या दरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या दोनवर पोहोचली आहे. मातमळनजीक झालेल्या या अपघातात जरीनाबी आयुब शहा (वय ४५) यांचा जागीच मृत्यू झाला होता, तर रंजना कास्तोडे गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना प्रथम मेहकर येथे उपचारार्थ भरती करण्यात आले. पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगरकडे नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यापश्चात पती, एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या मंगलाबाई जाधव यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत, तसेच लक्ष्मी करवते आणि ऑटोचालक आशेफ शहा व नशीर शहा यांच्यावर जालना येथे उपचार सुरू असल्याची माहिती आहे.




# हरकती नोंदविण्यासाठी पालिकेत चार टेबलची सोय !

जनसंचलन/ खामगाव

नगरपालिकेने लागू केलेल्या मालमत्ता कराच्या वाढीव दरांमुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, या वाढीव कराविरोधात हरकती नोंदविण्यासाठी सोमवारी नगरपालिकेत मोठी गर्दी उसळली. नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, हरकती स्वीकारण्यासाठी नगरपालिकेच्या वतीने चार स्वतंत्र टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. नगरपालिकेने नुकतेच मालमत्ता कराचे नव्याने मूल्यांकन करून कराच्या दरात लक्षणीय वाढ केल्याने सर्वसामान्य करदाते, व्यापारी, घरमालक तसेच व्यावसायिक मालमत्ताधारक अडचणीत सापडले आहेत. या वाढीव करामुळे आर्थिक बोजा वाढत असल्याची संतप्त भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या वाढीव करावर हरकती नोंदविण्यात येत आहेत. सकाळपासूनच नगरपालिकेच्या कर विभागात हरकती नोंदविण्यासाठी नागरिकांची रांग लागलेली दिसून आली. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून हरकती लेखी स्वरूपात सादर केल्या. गर्दीमुळे कामकाजावर ताण येऊ नये आणि नागरिकांना वेळेत सेवा मिळावी, यासाठी नगरपालिकेने चार टेबल कार्यरत केले आहे

पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४